टाइम्स सोमवार दि. २३ जानेवारी २०२३

# ध्वज बांधणी व त्याची आचारसंहिता कार्यशाळा

दोडामार्ग, २२ जाने. (प्रतिनिधी) - लक्ष्मीबाई सीताराम हळबे काला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, दोडामार्ग येथे प्रजासतक दिनाचे औचीत्य साधून जानेवारी २०२३ रोजी ध्वज बांधणी व त्याची आचार संहिता ही कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक यांचा महत्वाचा प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून विजयकुमार. साळुंखी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत सर उपस्थित होते. प्रजासतक दिनाचे औचीत्य साधून ल. सी. हळबे महाविद्यालयात देश भक्तीची जाणीव सर्वोच्या अंगी जोपासण्यासाठी एक आगळा-वेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला. देश भंक्ती साध्य करायची असेल, तर ध्वज बांधणी हे प्रत्येकाला येणे आवश्यकच आहे आणि हाच उद्देश समोर ठेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या संकल्पनेतून ध्वंज बांधणी व त्याची आचार संहिता ही कार्यशाळा एन. सी.



सी. विभाग मार्फत आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेचे प्रमुख मार्दर्शक व वक्ते विजयकुमार साळुंखी, शिक्षक, माध्यमिक विद्यालय झरेबांबर हे उपस्थित होते. राष्ट्र ध्वज बांधणी व ध्वज फडकविण्या बाबतची संपूर्ण तयारी तसेच पाळण्यात येणारी आवश्यक ती आचारसंहिता या बाबत विजयकुमार साळुंखी यांनी प्रात्यक्षिक दाखवीत उपस्थितांना महिती दिली. या कार्यशाळेचे प्रास्ताविक एन. सी. सी. विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत ढेपे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. सोपान जाधव यांनी केले. डॉ. एस. एस. पाडगावकर यांनी आभार व्यक्त केले.